# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.11.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

• विधानसभेच्या 288 जागांसाठी राज्यात मतदानाला सुरुवात,

• नांदेड लोकसभा पोटनिवडणूक आणि झारखंड विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यासाठीही आज मतदान

• राज्यातील 426 मतदान केंद्रांचं संचलन नारीशक्तीकडे

• पंचावन्नाव्वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात ईफ्फीला आजपासून गोव्यात प्रारंभ,

• प्रदूषण आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी कृतियोजना तयार करण्याचे केंद्राचे सर्व राज्यांना निर्देश

आणि

• महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताची अंतिम फेरीत धडक

**मतदान**

राज्यातल्या विधानसभेच्या 288 जागांसाठी नुकतीच, सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून राज्यातील 9 कोटी 70 लाखांहून अधिक मतदार आज आपले लोकप्रतिनिधी निवडणार आहेत. राज्यात 4 कोटी 69 लाखांहून अधिक महिला मतदार आहेत. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे, तर सुमारे साडे सहा लाख दिव्यांग मतदार आहेत. राज्यभरात मतदानासाठी एक लाख 427 मतदान केंद्रं उभारण्यात आली असून सर्वाधिक सुमारे साडे

आठ हजार मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहेत. तर सर्वात कमी, सव्वा नऊशे मतदान केंद्रं सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. गडचिरोली जिल्ह्यातही एक हजारापेक्षा कमी मतदान केंद्रं आहेत.

**महिला नियंत्रित केंद्र**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात 426 ‘महिला नियंत्रित मतदान केंद्र’ तयार करण्यात आली आहेत. या केंद्रांचं संपूर्ण नियंत्रण महिला करणार आहेत. नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त 45 मतदान केंद्रांचं नियंत्रण महिलांकडे असणार आहे. जळगावमध्ये 33, गोंदिया 32, सोलापूर 29 आणि  मुंबई उपनगरामध्ये 26 महिला नियंत्रित मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून विधानसभा निवडणुकीसाठी अशी केंद्र उभारण्यात आली आहेत.

**गृहनिर्माण संस्था केंद्र**

शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावं यासाठी पुणे, मुंबई, आणि ठाणे या सारख्या शहरांमध्ये अतिउंच इमारती, सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुलं यामध्ये एकंदर 1 हजार 181 मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. झोपडपट्टी भागात 210 मतदान केंद्र उभारण्यात आली असून सहाय्यक मतदान केंद्रांची संख्या 241 आहे.

**उमेदवार**

राज्यातल्या 288 मतदार संघांमध्ये एकंदर 4136 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत; यात 363 महिला उमेदवारांचा समावेश आहे. विविध 158 पक्षांनी, 2050 उमेदवारांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे, तर उर्वरित 2086 अपक्ष उमेदवार आहेत. सर्वाधिक 237 उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून, वंचित बहुजन आघाडीचे 200 उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं 149, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं 101 उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून 95, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून 86, शिवसेनेकडून 81, आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून 59 उमेदवार निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे 93, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे 32, प्रहार जनशक्तीचे 38, माकपाचे 3, एम. आय. एमचे 17, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे

4, जनसुराज्य शक्तीचे 6, शेकापचे 18, समाजवादी पार्टीचे 9 आणि भाकपाचे 2 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

**लोकसभा पोट निवडणूक**

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूकीसाठी देखील आज मतदान होत असून या पोटनिवडणुकीसाठी 19 उमेदवार आपलं नशीब आजमावत आहेत.

**निवडणूक**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देखील आज मतदान होत असून या टप्प्यात 12 जिल्ह्यांमधल्या 38 मतदारसंघांचा समावेश आहे.  त्यासाठी सर्व व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सहाशे तुकड्या संवेदनशील भागात तैनात करण्यात आल्या आहेत.

**तावडे**

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याविरोधात पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथल्या तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार संपल्यानंतर, मतदार नसलेल्या राजकीय नेते तसंच कार्यकर्त्यांनी मतदार संघात थांबण्याबाबतचा मनाई आदेश भंग केल्याप्रकरणी तावडे यांच्यासह महायुतीचे उमेदवार राजन नाईक आणि सुमारे अडीचशे कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, बहुजन विकास आघाडी पक्षाने मात्र तावडे यांच्यावर नालासोपाऱ्यातल्या एका हॉटेलमध्ये पैसे वाटप करत असल्याचा आरोप केला आहे. तावडे यांच्यासह भाजपने हे आरोप फेटाळले असून, या प्रकरणी निवडणूक आयोगाकडून चौकशी व्हावी, अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, यांनी तावडे यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे.

या विषयीची माहिती मिळाल्यानंतर भरारी पथक आणि पोलिसही तिथं पोहोचले. या प्रकरणी प्राथमिक माहिती अहवाल दाखल  करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं निवडणूक आयोगातर्फे किरण कुलकर्णी यांनी काल रात्री सांगितलं.

दरम्यान, डहाणू विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीकडून उमेदवारी मिळालेल्या सुरेश पाडवी यांनी मतदानाच्या आदल्या दिवशी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

**अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या 25 नोव्हेंबरपासून सुरुवात होत आहे. हे अधिवेशन 20 डिसेंबरपर्यन्त चालेल. त्यापूर्वी 24 तारखेला सरकारनं सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशन काळात लोकसभा आणि राज्यसभेचं  कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षीय सदस्यांनी सहकार्य करावं, असं आवाहन सरकारतर्फे या बैठकीत करण्यात येणार आहे, अशी माहिती संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली.

**बिर्ला भेट**

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल संसदेतील दोन्ही सदनांना भेट देऊन परिसराची पाहणी केली. बैठक व्यवस्था, भोजन व्यवस्था आदींची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी सूचनाही दिल्या.

**ईफ्फी**

पंचावन्नाव्वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात ईफ्फी आजपासून गोव्यात सुरू होत आहे. हा महोत्सव 28 नोव्हेंबरपर्यन्त चालेल. या महोत्सवात 81 देशांचे 180 चित्रपट दाखवले जाणार असून महोत्सव स्थळापासून चित्रपट प्रेक्षागृहापर्यन्त जाण्यासाठी नि:शुल्क सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी काल प्रसारमाध्यमांना दिली. महोत्सवाला ए.आर. रहमान, आर. माधवन, रकुल प्रीतसिंह, पंकज कपूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**कृतीयोजन**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं देशातील राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना हवामान बदल आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम याबाबत खबरदारी म्हणून, जिल्हा आणि शहर

पातळीवर कृती योजना विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव यांना, तसंच सल्लागारांना या संदर्भात पत्र पाठवलं असून या योजनांमध्ये वायू प्रदूषणाचा सामना करण्यासाठीची धोरणं समाविष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. प्रदूषणामुळे होणारे आजार आणि त्या अनुषंगाने आरोग्य प्रणाली अद्ययावत करण्यासाठीच्या शिफारसींचा या पत्रात समावेश आहे.

**इंदिरा गांधी**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या 107 व्या जयंतीनिमित्त काल त्यांना देशभर अभिवादन करण्यात आलं. हा दिवस ‘राष्ट्रीय एकात्मता दिवस’ म्हणून पाळला जातो. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी इंदिरा गांधी यांना राजभवन इथं पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. यावेळी राज्यपालांनी राजभवन मधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

**जयंती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण  करून अभिवादन केलं. यावेळी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.

**राज्य परिवहन महामंडळ**

राज्यात आज होत असलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाचं साहित्य आणि कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगानं  राज्य परिवहन महामंडळाच्या नऊ हजार 232 एसटी गाड्या आरक्षित केल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील मतदारसंघात जाण्याकरिता 490 एसटी गाड्या आरक्षित करण्यात आल्या आहेत. पुणे विभागाच्या ताफ्यात 890 एसटी बसगाड्या  आहेत; त्यापैकी 490 बसगाड्या निवडणुकीच्या कामासाठी वापरल्या जात आहेत. त्यामुळे प्रवासी सेवेत 400 बस उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे या दोन दिवसात बसगाड्यांची संख्या कमी आहे; या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये, म्हणून एसटी प्रशासनाने कमी प्रतिसाद असलेल्या मार्गावरच्या फेऱ्या रद्द करून त्या जास्त प्रतिसाद असलेल्या मार्गावर सोडण्याचं नियोजन केलं आहे.

## हॉकी

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत काल भारतानं जपानचा 2-0 असा पराभव करत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या गटातील सामन्यात चीननं मलेशियावर 3-0 अशी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना आज चीनशी होणार आहे.

## हवामान

अहिल्यानगर, पुणे, नाशिक इथं काल किमान तापमान 11 ते 12 अंश सेल्सियस होतं. राज्यात आज सर्वत्र सूर्यप्रकाशयुक्त हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**